# अंतिम सत्राच्या विद्यापीठ परीक्षा रद्द

(पान १ वरून) केल्यानंतरही राज्यात संभ्रमाचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर गुरुवारी राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक झाली. विद्यापीठे, महाविद्यालये, अंतिम सत्र, अंतिम वर्षाच्या पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांचे नियोजन या वेळी झाले. मुख्यमंत्री या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत पदवी परीक्षांबाबतचेच विषय अजेंड्यावर होते, असे सामंत यांनी सांगितले.

बीकॉम, बीएससी, बीए या अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षाही रद्द झाल्या आहेत. मागील सत्रात उत्तीर्ण झालेल्या आणि पदवी हवी असलेल्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण देऊन पदवी देण्यात येईल. ज्यांना परीक्षा द्यायची आहे त्यांनी लेखी लिहून दिल्यास त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक ठरवून त्या घेतल्या जातील आणि सरासरी गुणांवर ज्यांना श्रेणीत सुधारणा करून हवी आहे, त्यांना पुन्हा परीक्षा यासाठी लेखी देणे आवश्यक आहे, असाही निर्णय घेण्यात आला.कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय, विधी, व्यवस्थापन, आर्किटेक्चर, अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट, अध्यापन शास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षाही रद्द करण्यात आल्या आहेत. या परीक्षाही घेण्याच्या परिस्थितीत राज्य सरकार नाही, हे स्पष्ट करताना या अंतिम निर्णयाला 'त्या' अभ्यासक्रमांच्या दिल्ली येथील अपेक्स बॉडी यांच्याकडून मंजुरी मिळणे आवश्यक आहे, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.बॅकलॉग आणि एटीकेटीच्या विद्यार्थ्यांबाबत येत्या २ ते ३ दिवसांत सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आणि अधिकारी यांची शासन स्तरावर बैठक घेऊन, विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येणार असल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना तोवर दिलासा मिळाला आहे.परीक्षा पद्धतीत अनेक प्रक्रियांचा समावेश असतो. प्रश्नपत्रिका तयार करणे, बैठक व्यवस्था करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल जाहीर करणे, फेरमूल्यांकन करणे, परीक्षांसाठी पोलीस बंदोबस्त ठेवणे आदी कामे असतात. या प्रक्रियेत समाविष्ट व्यक्तींपैकी एकासही कोरोनाची लागण झाली तर ती इतर घटकांना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे विद्यार्थ्यांसह या अन्य घटकांच्याही आरोग्यास धोका उत्पन्न होऊ शकतो.

# अंतिम सत्राच्या परीक्षांबाबत आज निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अंतिम सत्राच्या परीक्षांचे नियोजन करण्याबाबत राज्य शासनाने शुक्रवारी आदेश काढला. त्यावर आज, शनिवारी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

अंतिम सत्रातील ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची नाही, ज्यांना परीक्षा द्यायची आहे. त्यांच्याकडून त्याबाबत लेखी संमती घेऊन पुढील नियोजन करावे, अशी सूचना या आदेशाद्वारे शासनाने केली आहे. या आदेशाबाबत प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी शुक्रवारी सांगितले.

# या वर्षातील पहिले खंडग्रास सूर्यग्रहण उद्या

कोल्हापूर : या वर्षातील पहिल्या खंडग्रास सूर्यग्रहणाची सुरुवात रविवारी (दि. २१) सकाळी १० वाजून ०३ मिनिटांपासून होणार आहे. सकाळी ११ वाजून ३९ मिनिटांनी सर्वांत जास्त म्हणजे सूर्याचा ५२.३७ टक्के पृष्ठभाग झाकला जाणार आहे. दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी ग्रहण संपणार आहे.

उत्तर भारतातील घारसाना, राजस्थान, सिरसा, हरियाणा आणि उत्तराखंडमधील डेहराडून आणि टिहरी इथून कंकणाकृती सूर्यग्रहण दिसेल. उर्वरित मध्य आणि दक्षिण भारतातून खंडग्रास सूर्यग्रहण दिसेल. यापुढील सूर्यग्रहण भारतात २५ ऑक्टोबर २०२२ मध्ये खंडग्रास दिसणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी शुक्रवारी दिली.

## चष्मे वापरावेत

ग्रहण पाहण्याकरिता विशिष्ट कागदापासून तयार केलेले चष्मे किंवा फिल्टर वापरावेत. पिनहोल कॅमेऱ्याच्या साहाय्याने सूर्यग्रहणाचे निरीक्षण ही सुरक्षित पद्धत आहे. चष्मे किंवा फिल्टर स्क्रॅच किंवा खराब झाले असेल तर वापरू नका, असे आवाहन डॉ. व्हटकर यांनी केले.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचा चार दिवसांत पगार द्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील हंगामी, कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार चार दिवसांत देण्यात यावा, अशी मागणी ऑल इंडिया यूथ फेडरेशनच्या शिष्टमंडळाने केली. त्याबाबतचे निवेदन प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना शुक्रवारी दिले.

विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये रोजंदारी, हंगामी आणि कंत्राटी पद्धतीने सुमारे ५०० कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना गेल्या तीन महिन्यांपासून पगार मिळालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. या कर्मचाऱ्यांचे पगार चार दिवसांत त्यांच्या खात्यावर जमा करावा. कंपनीचे कंत्राट रद्द करून पूर्वीप्रमाणे विद्यापीठाने स्वत: अशा कर्मचाऱ्यांची भरती करावी. किमान वेतनाचा कायदा विद्यापीठात लागू करावा. या कायद्यानुसार किमान १८ हजार वेतन कर्मचाऱ्याला मिळावे. या मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करावी. शिष्यमंडळात फेडरेशनचे गिरीश फोंडे, रजत शेख, अमोल देवडकर यांचा समावेश होता.

# अंतिम सत्राच्या विद्यापीठ परीक्षा रद्द

- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेणेही अशक्य : सामंत
- पदवी हवी असलेल्यांना सरासरी गुण देणार

**मुंबई :** राज्यातील विद्यापीठांच्या पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या परीक्षांसह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षाही घेणे शक्य नसल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. यामुळे पदवी परीक्षा रद्द झाल्या आहेत, या निर्णयावर तंत्रशिक्षणमंत्र्यांनी अधिकृत शिक्कामोर्तब केले. यासंदर्भात राज्य शासनाचा आदेश जारी झाला आहे, असे सामंत यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन बैठकीत हा निर्णय झाला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील विद्यापीठांच्या पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याची घोषणा ▶▶ पान ७ वर

# बीए, बीकॉम, बीएस्सी अंतिम वर्षाची परीक्षा रद्द

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक व अव्यावसायिक (बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कोरोनाची साथ नियंत्रणात केव्हापर्यंत येईल याबाबत स्पष्टता नसल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी फेसबुक लाईव्हद्वारे सांगितले. मात्र ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल, त्यांना परीक्षा देण्याची मुभा असणार आहे. एटीकेटी असलेल्या विद्यार्थ्यांबाबत पुढील दोन दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असेही स्पष्ट केले.

राज्यभरात १४ सार्वजनिक विद्यापीठांमध्ये अंतिम वर्षाच्या अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाला ७ लाख ३४ हजार ५१६ तर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी २ लाख ८३ हजार ९३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कोरोनाची राज्यातील परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने परीक्षेसाठी राज्यातील विविध ठिकाणांहून ये-जा करणे, एकत्र जमा होणे याचा विचार होणे गरजेचे आहे. सध्या राज्यातील

पान ९ वर »

## शिखर संस्थेची मान्यता घेणार

व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणजेच अभियांत्रिकी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकला, प्लॅनिंग, संगणकशास्त्र, विधी, शारीरिक शिक्षण, अध्यापन शास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र या निर्णयाला दिल्लीत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिखर संस्थेची मान्यता असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा निर्णय शिखर संस्थेकडे पाठवण्यात आला असून, त्यासंदर्भात स्वतंत्ररीत्या कळवण्यात येईल, असेही उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

# बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. अंतिम वर्षाची परीक्षा रद्द

(पान १ वरून) ४१ महाविद्यालयांच्या इमारती आणि १९८ वसतिगृहे ही विलगीकरण कक्षासाठी वापरात आहेत. वाढत्या कोरोनामुळे राज्यभरातील बहुतांश विद्यार्थी शिक्षणाच्या ठिकाणापासून आपल्या गावी गेले आहेत. कोरोना नियंत्रणात केव्हापर्यंत येईल याबाबत कोणतेही भाकीत करणे शक्य नाही. अशा परिस्थितीत अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा जुलैमध्ये घेणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय १८ जूनला झालेल्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत झाला असल्याचे सामंत यांनी स्पष्ट करत यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असल्याचेही सांगितले.

मागील सर्व सत्रांत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास त्यांनी लेखी द्यावे. त्यानंतर विद्यापीठांनी योग्य सूत्र वापरून निकाल घोषित करावा असे म्हटले आहे. एटीकेटी, बॅकलॉग विषयांच्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठांचे कुलगुरू व संबंधित अधिकाऱ्यांची शासनस्तरावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येईल. असेही ते म्हणाले.

**विद्यार्थ्यांना असणार मुभा...**

परीक्षा देण्यासंदर्भातील निर्णय घेण्याची मुभा विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची इच्छा असेल त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन त्यांना परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येणार आहे. अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेताना स्थानिक पातळीवरील कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर केले जाणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता प्रमाणपत्र हवे असेल त्यांना विद्यापीठांनी योग्य सूत्र वापरून त्यांचा निकाल जाहीर केला जाणार आहे.

**विद्यार्थ्यांसोबत ही तर हेराफेरी : आशिष शेलार**

बॅकलॉग व एटीकेटीच्या ३ लाख ४१ हजार ३०८ विद्यार्थ्यांना वाऱ्यावरच सोडले? राज्यातील विद्यार्थ्यांचा एकत्रित एकसूत्री निर्णय नाही... हे शैक्षणिक आरोग्य बिघडवण्याचे पाप असून आमची भीती खरी ठरली आहे. राज्य सरकारने विद्यार्थ्यांसोबत हेराफेरीच केली, अशा शब्दांत भाजप नेते, माजी शिक्षणमंत्री आमदार ॲड. आशिष शेलार यांनी टीका केली आहे.

### संभ्रम वाढणार...

सर्व सत्रांत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असल्यास त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन त्यांना परीक्षेला बसण्याची संधी देण्यात यावी. कोरोनाची स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल. यामुळे राज्यातील संभ्रम मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. असे विद्यार्थी मोठ्या संख्येने आले तर त्यांची परीक्षा कशी घेणार आणि नियोजन कसे करणार हा प्रश्न पुन्हा तयार होणार आहे. या विद्यार्थ्यांमुळे पुन्हा पदवी निकालाचा प्रश्न तयार होणार आहे.